# भारतातील प्राथमिक कृषि सहकारी पतपुरवठा संस्था : एक दृष्टिक्षेप

**प्रा.डॉ.माधवराव नरसिंगराव बिरादार**
सहयोगी प्राध्यापक आर्थशास्त्र विभाग,
दिगंबरराव बिंदु महाविद्यालय, भोकर जि. नांदेड
मो. नं. 9421768439

...ावना: भारतीय शेतीचा एक उद्योग या दृष्टीने विचार ... त्याच्या विकासात मुख्य अडचण भांडवल पुरवठ्याची आहे. ... अनियमित पर्जन्यमान, मागासलेल्या पिक उत्पादन पद्धती, ...तुकड्याची व विस्कळती जमिन आणि कमी उत्पादन क्षमता अनेक वैशिष्ट्यामुळे शेतीचा उद्योग धोक्याचा व अनिश्चित ... अशा स्थितीत भारतीय शेतींला भांडवल पुरवठा करण्यास ... व्यापारी बँका व इतर बँका तयार होत नव्हत्या. शेती व्यवसाय -...त करण्यासाठी भांडवलाची नितांत आवश्यकता भासत होती. ... भागात शेती व्यवसायासाठी सावकारी कर्जाचा आधार घेतला ...असे, परंतु या कर्जाचा व्याजदर जास्त असल्याने गरीब व अज्ञानी ...यांची फसवणुक केली जात असे. शेतकरी कर्जबाजारी झाला म्हणुन शेतीचा विकास व्हावा आणि त्या कार्यात शेतकरी वर्गापुढे ...या आर्थिक अडचणी दूर व्हाव्यात या हेतूने सहकारी पतपुरवठा ...ची निर्मिती व विकास करण्याखेरीज इतर कोणताही पर्याय ... सन 1904 साली भारतात पहिला सहकारी संस्थांचा कायदा ...त्वात आला. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना व दूर्बल घटकांना ...र तत्वावर भांडवल पुरवठा करण्यासाठी जर्मनीतील रायफायझन ...वर सहकारी पतपुरवठा संस्थांची स्थापना करण्यात आली. ...ला अल्प व मध्यम मूदतीचा कर्जपुरवठा करण्यासाठी सहकारी ...ची स्थापना करण्यात आली. त्यांची रचना त्रिस्तरीय आहे. राज्य ...ळीवर राज्य सहकारी बँका, जिल्हा पातळीवर जिल्हा मध्यवर्ती ... आणि गावपातळीवर प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्था कार्य ...तात. शेतकऱ्यांना सहकारी पद्धतीने पतपुरवठा करणाऱ्या संस्थांत ...मिक कृषी सहकारी पतसंस्था (PACS) या पायाभूत आहेत. ...र्ण सहकारी पतपुरवठ्याची रचना ह्या पायावर आधारलेली आहे. ...मुळे प्रस्तुत शोधनिवंधात भारतातील प्राथमिक कृषी सहकारी ...पुरवठा संस्थेच्या कार्य व प्रगतीवर दृष्टीक्षेप टाकण्यात आलेला ...हे.

## ...कारी पतपुरवठा म्हणजे काय?

... रिझर्व्ह बँकेच्या वैधानिक अहवालात (Statutory Report ...37) मध्ये असे नमुद करण्यात आले आहे की, "कृषी ...तपुवठ्याच्या ज्या आवश्यक अटी आहेत, त्या पूर्ण करणारी संस्था ...णजे सहकारी पतसंस्था होय. बहुतेक सर्व कृषीप्रधान देशातुन तिला ...शी मान्यता मिळालेली आहे". हेन्री उल्फ यांनी सहकारी पतसंस्थांची ...याख्या करतांना असे म्हटले आहे की, "संपत्तीचा अथवा श्रीमंतीचा ...आधार न घेता दुर्बल व्यक्तीजवळील तारण स्वीकारुन आणि यांच्या सोयीस्कर अटीवर बँकींग व्यवहार करणारी संस्था म्हणजे सहकारी पतपुरवठा संस्था होय".

थोडक्यात, प्राथमिक पातळीवर म्हणजेच खेडेगाव पातळीवर संस्था सभासदाची गरज लक्षात घेऊन सहकारी तत्वावर कर्जपुरवठा करीत असल्यामुळे अशा संस्थांना सहकारी पतपुरवठा संस्था किंवा प्राथमिक पातळीवर कृषी पतपुरवठा संस्था असे म्हणतात.

**कृषी सहकारी पतपुरवठा संस्थेचे कार्य :-**

अल्प व माध्यमकालीन सहकारी पतपुरवठ्याची जी त्रिस्तरीय रचना कार्यरत आहे, त्या रचनेत सर्वात खालच्या स्तरावर कार्यरत असणारी संस्था म्हणजे प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था होय. या संस्थेची स्थापना ही ग्रामीण भागातील शेतकरी स्वेच्छेने एकत्र येवुन करीत असतात. त्यामुळे या संस्थांचा शेतकऱ्यांशी प्रत्यक्ष संबंध येतो. शेती व्यवसायासाठी अल्प व मध्यम मूदतीचा कर्जपुरवठा करणे आणि विशेषत: कृषी उत्पादन वाढीसाठी बी-बियाणे, खते व जंतूनाशके, शेतीची अवजारे इत्यादींचा पुरवठा करणे हा या संस्थेचा मुख्य उद्देश असतो. तसेच सभासदांना बचतीची सवय लावणे, ठेवी गोळा करणे, शेतीमाल संग्रहणाच्या सोयी देणे, जीवनावश्यक वस्तूचा पुरवठा करणे आणि सभासदांच्या आर्थिक कल्याणाच्या योजना आखणे इत्यादी बाबीकडे या संस्था लक्ष देतात या बरोबर इतरही अनूषंगीक कार्ये त्या करतात.

1) **सभासदांना कर्ज देणे :-** प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्था आपल्या सभासदांना कृषी उत्पादनासाठी व उपभोगासाठी अल्प व मध्यम मूदतीचा कर्जपुरवठा करतात. तसेच दूष्काळी परिस्थीतीत सभासदांना कर्जरुपाने सहाय्य करतात.
2) **कृषी पुरक वस्तुंचा पुरवठा:-** शेती उत्पादनाच्या कार्यक्रमात सहभागी होऊन उत्पादन वाढविण्यासाठी या संस्था कर्जपुरवठा करतात. बीयाणे, खते, किटकनाशके तसेच अवजारे आवश्यकतेनुसार पुरवून उत्पादन वाढविण्यास मदत करतात. गरजेनुसार अन्य वस्तूचा पुरवठा ही या संस्था करताना दिसतात.
3) **बचत व ठेवी आकर्षित करणे** :- ग्रामीण भागातील जनतेकडून तसेच सभासदाकडून अल्प प्रमाणात बचती आणि ठेवी आकर्षिक करण्याकडे सहकारी पतसंस्था लक्ष देते. त्यामुळे संस्थेच्या कार्यासाठी आवश्यक भांडवल उभारता येते. स्थानिक बचती आणि ठेवीचा वापर करुन गरजवंत सभासदाना कर्जे दिली जातात.



Scanned with Oken Scanner

4) **कर्जवापर व परतफेडीवर लक्ष देणे :-** सभासदांना दिलेल्या कर्जाचा वापर सभासद कोणत्या कारणासाठी करतात यावर लक्ष देण्याचे कार्य करावे लागते. तसेच दिलेल्या कर्जाची व्याजासह वसूली करण्याचे काम या संस्था करतात. सहकारी खरेदी-विक्री संस्थेशी असलेल्या जवळच्या संबंधामुळे कर्ज वसूल होण्यास मदत होते.

5) **कल्याण कार्यक्रमात सहभाग :-** ग्रामीण भागाच्या आर्थिक व सामाजिक विकासासाठी शासन योजना आखत असते. त्याची कार्यकाही करण्याच्या कार्यात मदत करण्याची भूमिका संस्था स्विकारतात. खडी स्वावलंबी व्हावी या दृष्टीने संस्था विकासाच्या योजना आखून त्याची कार्यवाही करते.

**प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थेची प्रगती :**

सन 2005-06 ते 2014-15 या दहा वर्षांतील प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थेची प्रगतीची आकडेवारी तक्यात दर्शविलेली आहे.

**तक्ता क्र. 1 प्राथमिक सहकारी पतसंस्थेची प्रगती (सन 2005-06 ते 2014-15)**

| वर्षे | संस्थेची संख्या | सभासद (हजारात) | ठेवी (कोटी रु.) | भागभांडवल (कोटी रु.) | दिलेले कर्ज (कोटी रु.) |
|---|---|---|---|---|---|
| 2005-06 | 89827 | 93560 | 17566 | 4450 | 35552 |
| 2006-07 | 53339 | 92018 | 16054 | 3168 | 25237 |
| 2007-08 | 67146 | 92711 | 10987 | 4685 | 32932 |
| 2008-09 | 46222 | 65821 | 13375 | 2786 | 37465 |
| 2009-10 | 89523 | 122226 | 35680 | 6828 | 72882 |
| 2010-11 | 90279 | 106136 | 37282 | 7005 | 85295 |
| 2011-12 | 101297 | 127646 | 54763 | 9467 | 122826 |
| 2012-13 | 90458 | 110068 | 37561 | 8008 | 98440 |
| 2013-14 | 93042 | 130120 | 81895 | 9789 | 171420 |
| 2014-15 | 92789 | 121088 | 84616 | 11068 | 159050 |

आधार : National Co-operative Union of India 2016

वरील आकडेवाडीनुसार असे दिसून येते की, सन 2005-06 साठी भारतातील प्राथमिक कृषी पतसंस्थेची संख्या ही 89827 होती ती सन 2014-15 साली 92789 पर्यंत वाढलेले आहे. याच काळात सभासद संख्या 93560 हजारावरुन 121088 हजारापर्यंत वाढलेले आहे. कृषी पतसंस्थेच्या ठेवी व भागभांडवलामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झालेली दिसून येते. या संस्थांनी दिलेली कर्जाची रक्कम ही 35552 कोटी रुपयावरुन 159050 कोटी रुपयापर्यंत वाढलेली आहे. यावरुन असे दिसून येते की, प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्था शेतीला कर्ज पुरविण्याच्या बाबतीत उत्तम भूमिका बजावत आहेत. असेच म्हटले पाहिजे.

**-भारतातील प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्था एक दृष्टीक्षेप (2014-15)**

| तपशिल | टक्केवारी |
|---|---|
| व्यापलेली खेडी | 94.32 |
| कृषीपत पुरवठा | 17.48 |
| पैकी अल्पकालीन कर्ज | 80.83 |
| मध्यमकालीन कर्जे | 19.17 |
| कृषी कार्यासाठी दिलेले कर्ज | 47.96 |
| बिगर कृषी कार्यासाठी दिलेले कर्ज | 39.02 |
| इतर उद्देशाने दिलेले कर्ज | 13.02 |
| नफ्यातील संस्थेचे प्रमाण | 47.05 |
| तोट्यातील संस्था | 40.35 |
| प्रशिक्षीत कर्मचारी | 43.65 |

आधार : National Co-operative Union of India 2016

**कार्याचे मुल्यमापन :-**

सहकारी कृषी पतपुरवठ्यात किंवा बँक ... प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्था ही पायाभूत संस्था आहे. ... संख्यात्मक प्रगती केली असली तरी अजूनही ... पतपुरवठा गरजेच्या मानाने या संस्थेचे स्थान दुर्बलच आहे ... लागेल या संस्थांनी शेतकऱ्यांना वाढत्या प्रमाणात कर्ज ... असले तरी 2014-15 मध्ये देशातील एकुण कर्ज वाटपा... पतसंस्थेने केलेले कर्जवाटप केवळ 17.48 टक्के आहे. ... दिलेल्या कर्जाच्या वाटपावर नियंत्रण ठेवण्याची कोणती... प्राथमिक ~~कृषी पत~~ संस्थेकडे नाही. तोट्यातील पत संस्थेचे प्रमाण ... जास्त आहे. ही चिंतेची बाब आहे. कृषी पतसंस्थेची आर्थिक ... भक्कम नाही. संस्थेजवळील सभासदांच्या ठेवीत लक्षणीय ... सरकारकडून घेतलेल्या कर्जाच्या रक्कमा भरमसाठ आहेत. ... परतफेड होत नाही. परिणामत: अनेक पतसंस्था अडचणी... यातुनच थकबाकीची फार मोठी समस्या या संस्थांना अधिक ... बनवित आहे. दूसरे असे की, प्राथमिक कृषी पत... शेतकऱ्यांना मिळणारे कर्जेही अपूरी असतांत वाढत्या ... व्याजाचा बोजाही वाढत आहे.

**सारांश :-**

सहकारी पतसंस्था ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना ... घटकांना भांडवलपुरवठा करुन ग्रामीण भागाचा विकास करण्या... केले आहे. याशिवाय शेती उत्पादन वाढीसाठी शेतकऱ्यांना ... दरावर अल्प व मध्यम मुदती स्वरुपाचा कर्ज पुरवठा ... शेतीकार्यासाठी आवश्यक बी-बियाणे, खते, ...

...इत्यादी साहित्य पुरविले. यामुळे शेतकऱ्यांना सावकारी ... भासत नाही. कर्जपुरवठा करण्यासाठी ग्रामीण भागात ... कृषी पतसंस्था अस्तित्वात आल्या. यामूळे ग्रामीण ... विकास घडून येण्यास मदत झाली. या संस्थेने फक्त आर्थिक ... कार्य न करता ग्रामीण भागात सामाजिक विकासाच्या व ... उन्नतीचे कार्यक्रम राबविले आहे. काळाच्या ओघात या ... ग्रामीण भागातील जनतेला अधिक सेवा देण्याचे धोरण ... त्यानुसार कृषी व्यवसायाबाबत शिक्षण व प्रशिक्षण देणे, ... पद्धती, नवीन लागवडीच्या पद्धती व बियाणाचा वापर ... मार्गदर्शन केले आहे. तसेच पिक कर्जाचे वाटप विपणनाबाबत ... सुविधा देणे या प्रकारची महत्वाची भूमिका पार पाडली आहे. ... सहकारी पतसंस्थांनी ग्रामीण भागातील आर्थिक व ... परिवर्तनात महत्वाची भूमिका बजावली आहे.

...सूची :-


1) रायखलेकर ए.आंर, डांगे अशोक (1984), सहकार आणि व्यवहार, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे

2) चौगुले व्ही.टी./पठाण के.जी. (1980), भारतीय सहकारीच बदल कॉन्टीनेंन्टल प्रकाशन, पूणे

3) सराफ मोहन / दापके रमेश (1991), सहकार, विद्याप्रकाश नागापुर

4) कुलकर्णी पी.आर (1997), सहकाराची मुलतत्वे, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद

5) जोशी सी.के. (2000), सहकाराचा विकास, फडके प्रकाशन कोल्हापुर

6) कानेटकर मेघा / रुईकर वैशाली (2015) सहकार आणि ग्रामीण विकास, श्री साईनाथ प्रकाशन, नागापुर

7) माधव बिरादार (2018) सहकार, विद्याबूक्स पब्लिशर्स, औरंगाबाद

8) Indian Co-operative Movement, A statistical profit (2016), National Co-operative Union of India New Delhi.


❑❑❑



Scanned with Oken Scanner